# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २८/०६/२०१९ रोजी (का.प.क्र.०२) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

शुक्रवार दिनांक २८/०६/२०१९ रोजी (का.प.क्र.०२) मा.सभापती श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी ११:३५ वाजता वंदेमातरम् या गीताने सुरु झाली. सभेला मा.आयुक्त डॉ.श्री.निपुण विनायक,नगर सचिव,श्री.एस.आर.जरारे व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| अ.क्र. | उपस्थित स.सदस्यांची नांवे |
|---|---|
| ०१. | स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ०२. | स.स.श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे |
| ०३. | स.स.श्रीमती खान सायराबानो अजमल |
| ०४. | स.स.श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान |
| ०५. | स.स.श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर |
| ०६. | स.स.श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| ०७. | स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप |
| ०८. | स.स.श्रीमती सिमा कहानुलाल चक्रनारायण |
| ०९. | स.स.श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ |
| १०. | स.स.श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| ११. | स.स.श्री.नासेर तकिउद्दीन सिद्दीकी |
| १२. | स.स.श्रीमती सय्यद सरवत बेगम आरेफ हुसैनी |
| १३. | स.स.श्री.राजु रामराव शिंदे |

(यावेळी सर्व स.सदस्यांनी मा.सभापती यांना सभापती पदावर निवड झाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या.)

**विषय क्र. ०२ :**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०३ व १०४ अन्वये मा.आयुक्त यांनी स्थायी समितीकडे सादर केलेल्या सन २०१८-२०१९ चे सुधारीत व कलम ९५ अन्वये सादर केलेल्या सन २०१९-२०२० या वर्षीचे मुळ जमा व खर्चाचे अंदाजपत्रकावर विचार विनिमय करणे.

मा.सभापती : माझे सभापती पदाच्या काळात ही पहिलीच सभा आहे. सर्वांचे आभार मानते. मा.आयुक्तांनी जमा व खर्चाचे अंदाजपत्रकाची माहिती द्यावी.

लेखाधिकारी-१(श्री.पवार): कायद्याच्या तरतुदी प्रमाणे वार्षिक अर्थसंकल्प सादर करणे आवश्यक असल्यामुळे सन २०१७-१८ चे सुधारित व २०१८-१९ चे जमा व खर्चाचे अंदाजपत्रक मा.आयुक्त सादर करतील. त्यांनी अर्थसंकल्प सादर करावा.(यावेळी मा.आयुक्त अर्थसंकल्प सादर करतात.)

मा.आयुक्त : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३ व १०४ नूसार २०१८-१९ चे सुधारित व कलम ९५ नुसार या आर्थिक वर्षासाठी बजेट जे आहे ते सादर करीत आहोत. महानगरपालिका स्थापनेनंतरचा हा ३८ वा अर्थसंकल्प आहे. बजेटच्या अनुषंगाने काही ठळक बाबी निदर्शनास आणु इच्छितो. यामध्ये शहरातील विकास कामे व त्याची प्राथमिकता आणि गरज लक्षात घेऊन बजेट बनविण्यात आला आहे. बजेटमध्ये जमा आणि खर्च मागील गेल्या काही वर्षांमध्ये होत गेला आहे. काम करत असतांना महानगरपालिकेमध्ये एक टिम म्हणून काम करण्याचा प्रयत्न करुया. इन्फास्ट्रक्चरमध्ये रस्ते, स्ट्रीट लाईट, ड्रेनेज, पाण्याची व्यवस्था करावी लागते. हे सर्व सोयी सूविधा उपलब्ध

करुन देणे महानगरपालिकेचे काम आहे. नागरीकांचे आरोग्य चांगले रहावे म्हणून जे काही गार्डन, स्पोर्टस क्लचरल ॲक्टीव्हिटी या सगळया गोष्टी करण्याची महानगरपालिकेची जबाबदारी असते. शहरातील जे गरीब लोक आहेत त्यांच्यासाठी विशेषतः शिक्षण, आरोग्य, महिला व मुलांसाठी जी काही योजना आहे ती आणि दिव्यांगासाठी योजना आहेत. शहरातील सातारा देवळाई सारखे किंवा काही भागामध्ये आधीचे विकास कामे राहून गेलेली आहे त्यांना समोर ठेऊन बजेट बनवण्यात आलेले आहे. यामध्ये तीन महत्त्वाची कामे या वर्षी करायची आहे. पिण्याच्या पाण्याची नवीन योजना या वर्षी शासनाकडून मंजुर होईल. सुमारे ४०० कोटी रूपयाची पाणी पुरवठयासाठी तरतुद ठेवण्यात आली आहे. रस्त्याच्या बाबतीत मागील वर्षी शंभर कोटीच्या रस्त्यांना सुरुवात करण्यात आली. काम सुरू झाल्या नंतर मा.मुख्यमंत्री यांनी परत सव्वाशे कोटी रूपयांची घोषणा केली. हे दोन्ही मिळुन परत ४०० कोटी रूपये रस्त्यावर खर्च करणार आहोत. कचऱ्याचा चिकलठाण्याचा जो प्रकल्प पुर्ण झाला तसे इतर सर्व प्रकल्प पुर्ण करण्यासाठी १०० कोटी रु. यावर्षी खर्च करणार आहोत. अश्याच प्रकारे डेनेजसाठी १०० कोटी, विद्युतसाठी ७५ कोटी, प्रशासकीय खर्च १५० कोटी, गार्डनसाठी ३० कोटी, स्पोर्टसाठी १० कोटी हे सगळे धरून यावर्षी २०२० कोटी रु. चा बजेट स्थायी समीती समोर सादर करीत आहोत. यामध्ये त्याचा तपशील यामध्येपहाण्यास भेटणार आहे. २०१७-१८ मध्ये ५९९ कोटीचा बजेट केले होते, २०१८-१९ मध्ये आपण ८३१ कोटी हा सुधारीत अंदाज स्थायी समीती समोर ठेवतोय आणि २०१९-२० मध्ये २०२०.२४ कोटीचा बजेट ठेवतोय. मालमत्ता कर ६३ कोटी पासुन मागील वर्षी १०९ कोटी पर्यंत गेलो. शहरातील ८० हजार घरे अशी आहेत की ज्यांना अजुन टॅक्स नाही, ते टॅक्स मध्ये आणणार आहोत. तसे केल्यास २२५ कोटी पर्यंत वसुली करू शकतो. अनाधिकृत नळ शोध मोहीम चालवतोय त्यामध्ये लोकांनी अनाधिकृत कनेक्शनस घेतलेले आहे. अशा लोकांवर सक्षम कारवाई चालू राहिल्यावर ८७ किंवा १०० कोटी पर्यत जाऊ शकतो. याच्यासाठी बायलोसमध्ये ५००० रुपयांचा दंडाचा प्रावधान आहे. ५००० रुपयांचा शिवाय त्यांनी जे काही पाणी वापरले आहे आणि जितक्या वर्षापासून वापरलेले आहे ते सगळा फंड त्यांचाकडून वसूल करण्यात यावा. यासाठी मेन पावर लागणार आहे. नगर रचनेमध्ये रिकव्हरीचा खूप प्रोटेंशल आहे. मागील वर्षी यामध्ये एक नवी बिल्डींग परमिशन मॅनेजमेंट सिस्टम सूरु केलेला आहे. ज्या पध्दतीने अनाधिकृत बांधकामावर कारवाई केली जात नाही तो पर्यंत याच्यावर त्याचे गांभीर्य येणार नाही. आणि त्या बद्दलचे उत्पन्न ही महानगरपालिकेला मिळणार नाही. यावर्षी रितसर सर्व अनाधिकृत इमारतीचा सर्वे करुन त्या सर्वांना नोटीस देऊन त्यामध्ये स्वतंत्र सुट देऊन रेग्युलाईज करुन आणि जे रेग्युलाईज करता येत नाही त्याच्यावर कारवाई करु. यामुळे १५० कोटी पर्यंत नगररचना विभागाच्या माध्यमातुन उत्पन्न होण्याचे अंदाजीत आहे. महानगरपालिकेच्या आठवडी बाजाराची निविदा, नविन होर्डिंग धोरण, संत तुकाराम नाटयगृहाचे खाजगीकरण, नविन पार्कींग धोरण, व्यावसायीक परवाने इ. मुळे मालमत्ता विभागाचे उत्पन्न मागील वर्षापेक्षा दुप्पट करण्याचा प्रयत्न राहील. रस्त्यांकरिता १४५ कोटी निधी अपेक्षित आहे. घनकचरा व्यवस्थापनाकरिता १४८ कोटीचा डीपीआर तयार केलेला आहे. त्याचे सादरीकरण शासनाकडे करण्यात आलेले आहे. २२ कोटी निधी प्राप्त होण्याची शक्यता आहे. पाणी पुरवठा मध्ये ३६६ कोटी समांतरची कार्यवाही सुरु झाली तेव्हा पासुन पडलेले आहे. मागील वर्षात चिकलठाणा येथे रु.१५० मे.टन प्रतिदिन प्रक्रीया प्रकल्प पुर्ण करण्यात आला असुन त्याच धर्तीवर सन २०१९-२० मध्ये पडेगांव व हर्सुल येथील कचरा प्रक्रीया प्रकल्प पुर्ण करण्यात येतील. कांचनवाडी येथे ३० मे.टन प्रतिदिन बायोमिथेनेशन प्रक्रीया प्रकल्प सुध्दा लवकर सुरु होईल. शहरामध्ये पाण्यासाठी ४०० कोटी ठेवण्यात आले आहे. ड्रेनेजचा प्रकल्प पुर्ण झालेला आहे.

महानगरपालिकेतर्फे ४५ कोटी देण्याचे राहिलेले आहे. भांडवली खर्च धरुन ६५ कोटी इतका आहे. सातारा देवळाई येथील ड्रेनेज प्रकल्प शासनास पाठवण्यात आलेला आहे. मंजुरी नंतर ते काम ही हाती घेण्यात येईल. शहरामध्ये सार्वजनिक शौचालयाची कमतरता असून ५० नविन सार्वजनिक शौचालये बांधण्यात येतील. महिला व बालकल्याण समितीतर्फे १५ सुलभ शौचालयाचे काम समितीच्या आराखड्यामधुन करत आहोत. हरीत व आरोग्यदायी शहरासाठी नविन उद्यान करणे, अस्तित्वातील उद्यान दुरुस्त करणे, कचरा प्रक्रीया पुर्ती आणि अमृत योजना अंतर्गत वृक्ष लागवड व देखभाल दुरुस्तीच्या कामाचा समावेश करण्यात आलेला आहे. सलिम अली सरोवराच्या पुनरुज्जीवन कामे हाती घेण्यात आली असुन मागील काही महिन्यात तलावातील जलपर्णी काढून तलावामध्ये कमळाची लागवड करण्यात आली आहे. नागरीकांसाठी क्रिडा केंद्र व जलतरण तलावाची दुरुस्ती करण्यात येईल जेणेकरुन नागरीकांना वाजवी दराने ते उपलब्ध होईल. गरवारे क्रिडा संकुलाच्या आधुनिकीकरणासाठी अर्थसंकल्पामध्ये ३.५० कोटी तरतुद करण्यात आली असून त्यातील आवश्यक ती कामे हाती घेण्यात येतील. शहरामध्ये प्राणीसंग्रहालयास जागा कमी पडत असल्याने सफारी पार्क येथे १०० एकर येथे सदरील प्राणी संग्रहालय स्थलांतरीत करण्यासाठी कार्यक्षम सल्लागार ची नेमणूक केलेली असून त्याच्या मार्फत मास्टर प्लॅन करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. सदरील मास्टर प्लान Central Zoo Authority च्या मान्यतेनंतर अंमलात आणता येईल. मयत झालेली जनावरे यासाठी श्वान स्मशानभूमि करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. आपात्कालीन व्यवस्थापनासाठी महानगरपालिकेचा अग्निशमन विभाग महत्वाची जबाबदारी बजावत असून मागील वर्षी १७०५ कॉल अटेंड करून ११ नागरीकांचे जीव वाचविले आणि रु.३१.०० कोटी मालमत्तांचे नुकसान होण्यापासून वाचविले. अग्निशमनसाठी ३३ कोटी बजेटमध्ये ठेवण्यात आलेले आहे. मनपाच्या शाळेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी मनपाच्या शाळांमधुन अनेक उपक्रम हाती घेतले आहे. यामध्ये शिक्षकांना प्रशिक्षण, मुठभर गोष्टी पुस्तकाचे प्रकाशन, समर कँप इ. उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत नविन आठ आरोग्य केंद्र तयार झालेले असून ते या वर्षी कार्यान्वीत करण्यात येतील. याशिवाय हेगडेवार रुग्णालय व इतर रुग्णालयांच्या मदतीने महानगरपालिका आरोग्य केंद्रातून चांगल्या दर्जाची नागरीकांना सेवा सुविधा देण्याचा प्रयत्न केला जाईल. महिला व बालकांच्या कल्याणासाठी महिला व बाल कल्याण समितीच्या मार्फत मागील वर्षी प्रशासनाने आराखडा तयार केला असून त्या अनुषंगाने उपाय योजना हाती घेण्यात येतील. यात प्रामुख्याने महिलांसाठी सॅनेटरी नॅपकीन मशीन, किशोरवयीन मुलींसाठी प्रशिक्षण, स्वसंरक्षण प्रशिक्षण इ. उपक्रम हाती घेतले जातील. दिव्यांगांच्या विकासासाठी त्यांना सोई सवलती देणेसाठी आराखडा तयार करण्यात आला असून त्याची पुर्णपणे अंमलबजावणी करण्यात येईल. यासाठी १०.५० कोटी तरतुद अर्थसंकल्पात राखीव ठेवली आहे. मुलींना सेल्फ डिफन्सचे प्रशिक्षण सुध्दा देण्यात येणार आहे. माजी सैनिकांना सवलत देणे बाबत विचार करण्यात येतो. अतिक्रमण बाबत कार्यवाही चालू आहे. आकृती बंध केला. जी.बी समोर येईल, त्यात वाढीव पदांना मंजूरी घ्यायची आहे. सिटी बसेस सुरु केल्या, आणखी नवीन बसेस सूरु करणार आहोत. जे काम हाती घेऊ ते पूर्णत्वाकडे जाणार आहे. सर्व माध्यमातून सहकार्य मिळत आहे. सन २०१८-१९ मध्ये महानगरपालिकेचे सर्व पदाधिकारी व स.सदस्य यांनी विकासकामासाठी मोलाचे मार्गदर्शन व पाठींबा दिला असुन सन २०१९-२० मध्ये या शहराच्या विकासासाठी सर्व प्रस्तावित उपाययोजनांस सर्वाचे सहकार्य लाभेल.

(मा.आयुक्तांनी प्रेजेंटेशन नुसार सभागृहात माहिती दिली.)

श्री.गजानन बारवाल : मा.आयुक्तांनी सविस्तर माहिती दिली आहे. पाणी, रस्ते, वसुली आणि विविध क्षेत्रातुन येणारा महसुल उत्पन्नाकडे मा.आयुक्तांनी माहिती सांगितली आहे. यामध्ये ठेकेदारांचे पेमेंट करु शकलो नाही म्हणुन काही कामे रखडलेले आहे. शासन आणि केंद्र शासनाकडुन मोठ्या प्रमाणात निधी येणार आहे. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची रिक्त पदे मोठ्या प्रमाणात आहेत. भरती करणे गरजेचे आहे किंवा त्याचे नियोजन करणे गरजेचे आहे. अग्निशमन दल सक्षम करणे गरजेचे आहे. ५ अग्निशमन केंद्र करावे. त्याचा निधी कुठे खर्च केला. ज्या कामासाठी निधी येतो त्याच कामासाठी निधी वापरला गेला पाहिजे. ज्या वार्डात कर वसुली होते तेथे काम करावे आणि जे बजेट सादर केले आहे या विषयामध्ये अभ्यास करण्यासाठी वेळ देण्यात यावा. मंजूर कामे मार्गी लागत नाही.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : ज्याप्रमाणे वार्डामध्ये टॅक्स जमा होतो त्याच प्रमाणे त्या वार्डातील कामे झाली पाहिजे.

श्री.नासेर सिद्दिकी : या विषयामध्ये अभ्यास करण्यासाठी वेळ देण्यात यावा. सभा तहकुब करुन पुढच्या बैठकीत चर्चा घेण्यात यावी.

श्री.राजु शिंदे : यामध्ये ज्या संकल्पना मांडल्या आहेत त्या पुर्ण कशा होतील हे मांडलेले नाही. बजेट सादर केला आहे यामध्ये अभ्यास करण्याकरिता पुर्ण वेळ मिळाला पाहिजे. आठ दिवसाचा वेळ देण्यात यावा आता ही सभा तहकुब करण्यात यावी.

श्रीमती.सत्यभामा शिंदे : ज्या फाईल मंजुर आहेत आणि जे टेंडर निघालेले आहेत अशी कामे स्पील मध्ये घेण्यात यावे.

श्रीमती.सायरा बानो : फायर स्टेशन करिता मंजुरी मिळाली आहे आणि टेंडर निघालेले आहे या बजेट मध्ये पाच फायर स्टेशन कॉन्ट्रॅक्टरला देण्यात यावे.

श्री.सचिन खैरे : या विषयामध्ये अभ्यास करण्यारिता वेळ देण्यात यावा. पावसाळा सुरु झाला आहे. नाले सफाईकडे लक्ष देण्यात यावे.

श्रीमती.सुरेखा सानप : शाळेमध्ये शिक्षकांची खुप कमतरता आहे. मनपाच्या शाळेच्या बिल्डींग व्यवस्थीत नाही. शाळेच्या बिल्डींगच्या मजबुती करणाकडे लक्ष दिले पाहिजे.

श्रीमती.सत्यभामा शिंदे : एन-२, ठाकरेनगर आणि कामगार चौक या ठिकाणी सन २००५ पासुन सुलभ शौचालयाची मागणी करत आहोत. त्या ठिकाणी उघड्यावर लोक शौचालयास बसतात. या तीन ठिकाणी सुलभ शौचालय करण्यासाठी याची बजेटमध्ये तरतुद केलेली आहे का?

मा.आयुक्त : एन-२, ठाकरेनगर आणि कामगार चौक या ठिकाणी सुलभ शौचालयाकरिता घेतलेले आहे.

मा.सभापती : सन २०१९-२० या वर्षीचे मुळ जमा व खर्चाचे अंदाजपत्रक प्रशासनातर्फे सादर करण्यात आला आहे. सदस्यांनी केलेल्या सुचना प्रमाणे जो अर्थसंकल्प सादर केला आहे त्यावर अभ्यास आणि सविस्तर माहिती करुन घेण्यासाठी ही सभा आठ दिवसानंतर आयोजीत केली जाईल, आता ही सभा तहकुब करण्यात येते.

या बरोबरच सभा तहकुब केल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**एस.आर.जरारे**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद